RNI No. MAHBIL/2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ७, अंक ४] गुरूवार, जानेवारी १४, २०२१/पौष २४, शके १९४२ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ५**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ जानेवारी, २०२१.

**अधिसूचना**

**प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९.**

क्रमांक डीआयएस-२०२१/प्र.क्र.३/पदुम-४.—प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ (२००९ चा क्रमांक २७) याच्या कलम ६ च्या पोट-कलम (१) व (२) तसेच कलम ७, ११, १२ व १३ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे,—

(क) कोणत्याही नियंत्रित क्षेत्रातून कोणत्याही संक्रमित पक्षासंबंधी प्रजातीचा जिवंत किंवा मृत पक्षी, कोणत्याही पक्षाचे कोंबडी खाद्य, पिल्ले, कोंबडी खत किंवा कोणत्याही संक्रमित पक्षी प्रजातीच्या पक्षाच्या आणि जे त्याच्या मृत शरीराच्या, अशा पक्षाच्या त्वचेच्या किंवा अन्य कोणत्याही अवयवाच्या किंवा उत्पादनाच्या संपर्कात आलेले आहे असे इतर कोणतेही साहित्य घेऊन जाण्यास कोणत्याही व्यक्तीस मनाई करता यावी म्हणून; आणि

(ख) नियंत्रित क्षेत्रात पक्षीसंबंधी प्रजातीच्या पक्षाचा कोणताही पक्षी बाजार, पक्षी जत्रा, पक्षी प्रदर्शन भरविण्यास; आणि पक्षांसंबंधी प्रजातीच्या पक्षांचा गट करण्याचा किंवा एकत्रिकरण करण्याचा अंतर्भाव असणारी अन्य कोणतीही कृती करण्यास मनाई करता यावी म्हणून; आणि

(ग) उक्त संक्रमित पक्षांसंबंधी प्रजातीचे पक्षी, नियंत्रित क्षेत्रातील बाजारात, जत्रेमध्ये, प्रदर्शनात किंवा पक्षांच्या इतर घोळक्यात किंवा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी आणण्यास किंवा आणण्याचा प्रयत्न करण्यास मनाई करता यावी म्हणून; आणि

(घ) पक्षांसंबंधी प्रजातीच्या पक्षांची ने-आण करताना, वाहतुकीपूर्वी आणि वाहतुकीनंतर तात्काळ स्वच्छता व निर्जंतुकीकरण करता यावे म्हणून,

महाराष्ट्र राज्यातील (१) मुरंबा क्षेत्र, तालुका व जिल्हा परभणी, (२) केंद्रेवाडी गाव, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर व (३) सुकनी गाव, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांच्या ग्रामपंचायतींना, उक्त अधिनियमा अन्वये जो अधिसूचित रोग म्हणून घोषित केले आहे आणि ज्याद्वारे, पक्षांसंबंधी प्रजाती पक्षी (यात यापुढे ज्याचा निर्देश "संक्रमित पक्षांसंबंधी प्रजाती पक्षी" असा केला आहे), संक्रमित झालेले आहेत अशा "पक्षांसंबंधी शीतज्वराच्या (एव्हीअन एन्फ्ल्युएन्झा) " बाबतीत नियंत्रित क्षेत्र (यात यापुढे ज्याचा निर्देश, 'नियंत्रित क्षेत्र" असा केला आहे), म्हणून घोषित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनूप कुमार,**
शासनाचे प्रधान सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 12th January, 2021.

*NOTIFICATION*

PREVENTION AND CONTROL OF INFECTIOUS AND CONTAGIOUS DISEASES IN ANIMALS ACT, 2009.

No.DIS-2021/C.R.3/ADF-4.—In exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 6 read with sections 7, 11, 12 and 13 of the Prevention and Control of Infectious and Contagious Diseases in Animals Act, 2009 (No. 27 of 2009), the Government of Maharashtra hereby declares the Grampanchayats of (1) Muramba Area, Tal. and Dist. Parbhani, (2) Village Kendrewadi, Tal. Ahamedpur, Dist. Latur and (3) Village Sukni, Tal. Udgir, Dist. Latur in the State of Maharashtra as a controlled area (hereinafter referred to as "the controlled area"), in respect of the "Avian Influenza", which is a scheduled disease declared under the said Act, whereby Avian species birds are infected (hereinafter referred to as "the infected Avian species birds"), so as to,—

(*a*) prohibit a person to take any infected Avian species bird, alive or dead, any kind of poultry feed, litter, poultry mannure or other material which has come into contact with any infected Avian species bird and the carcass, skin or any other part or product or such bird out of the controlled area; and

(*b*) prohibit holding or any bird market, bird fare, bird exhibition of the Avian species bird; and also to carry on any other activity involving grouping or gathering of the Avian species bird in the controlled area; and

(*c*) prohibit to bring or attempt to bring said infected Avian species bird into market, fair, exhibition or other congregation of bird or to any public place in the controlled area.

(*d*) clean and disinfect immediately before and after the transportation of Avian species bird kept in transit.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANOOP KUMAR,
Principal Secretary to Government.

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ जानेवारी, २०२१.

**अधिसूचना**

**प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९.**

क्रमांक डीआयएस-२०२१/प्र.क्र.३/पदुम-४.–प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ (२००९ चा क्रमांक २७) याच्या कलम ३६ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, उक्त अधिनियमान्वये घोषित केलेला “पक्षासंबंधी शीतज्वर (एव्हीअन एन्फ्ल्युएन्झा)” या अनुसूचित रोगाच्या प्रतिबंधासाठी, नियंत्रणासाठी व निर्मूलनासाठी, राज्य शासन, याद्वारे महाराष्ट्र राज्यातील त्याच्या स्थानिक प्राधिकार क्षेत्रातील सर्व जिल्हाधिकारी यांना त्यांचे सर्व अधिकार प्रदान करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनूप कुमार,**
शासनाचे प्रधान सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Madam Cama Marg,Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 12th January, 2021.

*NOTIFICATION*

PREVENTION AND CONTROL OF INFECTIOUS AND CONTAGIOUS DISEASES IN ANIMALS ACT, 2009.

No. DIS-2021/C.R.3/ADF-4.—In exercise of the powers conferred by section 36 of the Prevention and Control of Infectious and Contagious Diseases in Animals Act, 2009 (No. 27 of 2009), for the prevention, control and eradication of the scheduled disease “Avian Influenza” declared under the said Act, the Government of Maharashtra hereby confers all its powers on all the District Collectors within their local jurisdiction in the State of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANOOP KUMAR,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.